# अमरावतीच्या जिल्हा स्त्री सामान्य रुग्णालयातील नवजात शिशु अतिदक्षता विभागाला भीषण आग, तीन बालकांचा मृत्यू







सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on


E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १८१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २४ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४


## घटनेतील इतर सहा बाळांवर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात उपचार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

अमरावती जिल्हा स्त्री सामान्य रुग्णालयात सोमवारी पहाटे साडेतीन वाजता नवजात शिशु अतिदक्षता विभागाला भीषण आग लागली. या आगीत एकूण तीन नवजात बाळ भाजून दगावल्याची दुर्दैवी घटना घडली.पहाटे साडेतीनला लागली आग – जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात सोमवारी पहाटे साडेतीन वाजता भीषण आग लागली. यावेळी नवजात शिशू अतिदक्षता विभागात कार्यरत असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, ही आग इतकी भीषण होती की अवघ्या काही



वेळात रौद्ररूप धारण केलं.

या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिसांनी जिल्हा स्त्री सामान्य रुग्णालयात धाव घेतली.

या घटनेवेळी नवजात शिशु अतिदक्षता विभागात एकूण नऊ बालक दाखल होतो. या भीषण घटनेत तीन बालक भाजून दगावले, तर सहा बाळांना कर्मचाऱ्यांनी अतिदक्षता विभागातून बाहेर काढलं. या घटनेमुळे प्रचंड खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, सोमवारी पहाटे साडेतीन वाजता नवजात शिशु अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरमध्ये अचानक स्फोट झाला. त्यामुळे लागलेली आग अतिदक्षता विभागात वेगाने पसरली. मात्र, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी या कक्षातील बालकांना वेगाने बाहेर काढले.

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर एकूण तीन नवजात शिशु अतिदक्षता कक्ष आहेत. या तीन कक्षांमध्ये प्रत्येकी १३ अशी मिळून ३९ नवजात बालकांवर उपचार घेण्याची क्षमता आहे. यापैकी एका कक्षात आग लागली. आग लागल्याचे लक्षात येताच ड्युटीवर असलेल्या डॉक्टर आणि नर्सेस, कर्मचाऱ्यांनी या कक्षातील लहान बाळांना बाहेर काढले. मात्र, यात तीन बालकांचा मृत्यू झाला.

### कठोर कारवाई करा : राणा



जिल्हा स्त्री रुग्णालयातील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. मुख्यमंत्र्यांनी आवश्यक तो निधी तातडीने देऊन ही इमारत उभी झाली. येथे सर्व अत्याधुनिक सुविधा असतानाही अशी घटना होणे म्हणजे संबंधित अधिकाऱ्यांचे व्यवस्थेकडे अजिबात लक्ष नव्हते असा त्याचा अर्थ होतो. वेळोवेळी आढावा घेताना कोणी त्रुटी असल्याचे सांगितले नाही. या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी आमदार रवी राणा यांनी केली.

### इमारत, उपकरणे, वायरिंग नवीन

जिल्हा स्त्री रुग्णालयाची इमारत नवीन आहे. येथील वायरिंग, उपकरणे व अन्य साहित्य नवीन आहे. एक वर्षापूर्वीच या इमारतीतून कामकाज सुरू झाले. सर्व काही नवीन असताना ही घटना घडल्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. झालेल्या कामात काही दोष होते का? किंवा मेन्टेनन्सकडे दुर्लक्ष झाले का? असे प्रश्न उपस्थित होत आहे. घटनेची सविस्तर चौकशी सुरू करण्यात आली आहे.

### पोलीस आयुक्तांनी केली पाहणी

अमरावतीचे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी देखील घटनास्थळाची पाहणी केली. या आगीमागचं नेमकं कारण काय? याची चौकशी केली जाईल, असं पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केलं.

### उच्चस्तरीय चौकशीचे आदेश : बावनकुळे



अमरावतीमधील आजच्या दुर्घटनेमुळे मी खूप दुःखी आहे. दगावलेल्या नवजात बालकांना अतिशय व्यथित अंतःकरणाने श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या पालकांना हे दुःख सहन करण्याची ताकद ईश्वर देवो, अशी प्रार्थना करतो. या घटनेच्या संपूर्ण चौकशीचे आदेश मी दिले आहेत. जे जखमी झाले त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांना सर्व प्रकारची वैद्यकीय सहायता दिली जात आहे. मृत बालकांच्या नातेवाईकांच्या पाठीशी सरकार उभे असून, सरकार व प्रशासन संपूर्ण मदत करत आहे. मी जिल्हा प्रशासनाच्या सतत संपर्कात असून, आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या आहेत. प्रशासन पूर्णपणे लक्ष ठेवून आहे. अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली. आगीचे नेमके कारण अजून समजू शकलेले नाही, अशी प्रतिक्रिया राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

## आगीवेळी स्प्रिंकलर पूर्णपणे बंद

### जिल्हा स्त्री रुग्णालयाचा भोंगळ कारभार पुन्हा चव्हाट्यावर

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती :**

अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात लागलेल्या आगीत तीन नवजात बाळांचा होरपळून मृत्यू झाल्याच्या घटनेची धक्कादायक इनसाईड स्टोरी आता समोर आली आहे. आग लागली त्यावेळी रुग्णालयातील स्प्रिंकलर यंत्रणा पूर्णपणे बंद असल्याची माहिती खुद्द जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत आग नियंत्रणात आणण्यासाठी असलेली यंत्रणाच बंद असल्याचे स्पष्ट झाल्याने रुग्णालय प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.आगीची घटना घडली तेव्हा स्प्रिंकलर सुरू होते का, असा सवाल उपस्थित झाल्यानंतर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी 'स्प्रिंकलर बंद होते, ही वस्तुस्थिती आहे,' अशी स्पष्ट माहिती दिली. त्यामुळे नवजात बाळांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या आगीत सुरक्षाव्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत.रुग्णालयात नवजात बाळांसाठी अत्यंत संवेदनशील विभाग असतानाही आग प्रतिबंधक यंत्रणा कार्यरत का नव्हती, असा




### ठिकाणी सुरू आहेत इतर बाळांवर उपचार

शहरातील विविध रुग्णालयांत हलवण्यात आले आहे:पंजाबराव देशमुख रुग्णालय: ११ बालकेसुपर स्पेशालिटी हॉस्पिटल: ५ बालकेमुरके हॉस्पिटल: ८ बालकेहोप हॉस्पिटल: ६ बालकेपारिजात हॉस्पिटल: २ बालकेमातेसोबत ठेवण्यात आलेली बालके: ४ बालकेमोफत उपचारांचे आदेश: स्थलांतरित केलेल्या सर्व बालकांवर पूर्णपणे मोफत उपचार करण्याचे कडक निर्देश सर्व संबंधित खाजगी व सरकारी रुग्णालयांना देण्यात आले आहेत; पालकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही असे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. स्प्रिंकलर यंत्रणा बंद असण्यामागचे नेमके कारण काय, त्याची देखभाल कोणाची जबाबदारी होती आणि निष्काळजीपणासाठी कोण जबाबदार आहे, याची चौकशी होणे गरजेचे आहे.दरम्यान, माजी खासदार नवनीत राणा यांनीही या प्रकारावर संताप व्यक्त केला आहे. 'स्प्रिंकलर बंद का होते, याची चौकशी करून दोषींवर कारवाई करू,' असा इशारा त्यांनी दिला आहे.तीन निष्पाप नवजात बाळांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्यानंतर आता रुग्णालयातील अग्निसुरक्षा व्यवस्थेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. स्प्रिंकलर बंद असतानाही रुग्णालय प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष झाले का? याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई होणार का, याकडे अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे.

## आरोग्यमंत्र्यांकडून घटनास्थळाची पाहणी, ७ सदस्यीय चौकशी समितीची घोषणा, ८ दिवसांत अहवाल देणार

## मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाखांची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती २६**

अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात आग लागून ३ नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आणि क्लेशदायक आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी आरोग्य आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती नेमण्यात आली असून, येत्या ८ दिवसांत ही समिती आपला अहवाल सादर करेल. निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी अथवा कंत्राटदाराला पाठीशी घातले जाणार नाही; दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिला आहे. दुर्घटना घडल्यानंतर आरोग्यमंत्र्यांनी थेट अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाला भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली.



त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करेल. यामध्ये एम्सचे प्रतिनिधी, डीएमईआरचे तज्ज्ञ, महावितरणचे मुख्य विद्युत अभियंता (इलेक्ट्रिकल चीफ इंजिनियर आणि फायर सेफ्टी तज्ज्ञांचा समावेश असेल. ही समिती संपूर्ण तांत्रिक बाबी, मशिनरी आणि यंत्रणेतील त्रुटींची तपासणी करून ८ दिवसांत शासनाला सविस्तर अहवाल सादर करेल. अहवालात ज्यांच्यावर ठपका ठेवला जाईल किंवा ज्यांचा निष्काळजीपणा समोर येईल, त्यांच्यावर तत्काळ कठोर कारवाई केली जाईल.

संबंधित व्हेंटिलेटर वॉरंटी काळात होते आणि ६ तारखेलाच कंपनीकडून त्याचे इन्स्पेक्शन झाले होते, तरीही ही दुर्घटना कशी घडली? याची तांत्रिक तपासणी केली जाईल. आगीच्या वेळी सायरन वाजले होते का, स्प्रिंकलर्स आणि फायर फॉग सिस्टिम कार्यान्वित होती का, याचीही पडताळणी केली जात आहे. उपकरण पुरवणाऱ्या कंपन्या किंवा कंत्राटदारांची प्रक्रिया नियमांनुसार झाली होती का, हे तपासले जाईल. निकृष्ट दर्जाची उपकरणे देणाऱ्या आणि हलगर्जीपणा करणाऱ्या कंत्राट दारांवर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकले जाईल. मेळघाट आणि राज्यातील दुर्गम व आदिवासी भागातील आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी १४०० डॉक्टरांची भरती प्रक्रिया राबवली जात आहे. आदिवासी भागात सेवा देणाऱ्या डॉक्टरांना ३ वर्षांनंतर त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी पदस्थापना दिली जाईल. कर्तव्यावर गैरहजर राहणाऱ्या ५०० डॉक्टरांना सेवेतून कमी करण्यात आले असून, अन्य ५०० जणांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. राज्यातील ग्रामीण व जिल्हा रुग्णालयांमध्ये विशेषज्ञ डॉक्टरांची कमतरता भासू नये, यासाठी ७०० ते ८०० स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या नियुक्तीचे आदेश पुढील आठवड्याभरात जारी केले जातील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### राज्यातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांचे फायर ऑडिट

अमरावती आणि यापूर्वी घडलेल्या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शासकीय तसेच खासगी रुग्णालयांच्या फायर ऑडिट नियमावलीचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी उद्या मंत्रालयात तातडीची उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात आली आहे. निधीअभावी फायर ऑडिट किंवा नूतनीकरण थांबले असल्यास संबंधित प्रशासनाने त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे होते. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत रुग्णांची सुरक्षा हीच सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय ......

# तरुणाईला समजून घेण्याची उपरती

देशभरातील आणि महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांना अचानक झेन जींचे महत्व वाटण्याची अनेक कारणे आहेत. त्यातही त्यांची देशाच्या एकूण मतदानातील टक्केवारी, समाज आणि राजकारणावरील तरुणाईचा वाढता प्रभाव हे महत्वाचे कारण आहे. अभिजीत दीपकेंच्या आंदोलनाला देशपातळीवर यश मिळाल्यानंतर या तरुणाईकडे देशातील सत्तेचे तसेच राजकारणाचेही लक्ष गेले, तोपर्यंत देशातील समाज आणि राजकारण तरुणाच्या मुद्द्यावर पुरेसे गंभीर नव्हते. अबोध, अजाण आणि अनुभव नसलेला विशी पंचविशीतला समूह असेच पूर्वग्रह तरुणाईविषयी होते. कोणत्याही समूहाचे प्रश्न सोडवण्याऐवजी त्यांच्या मतांच्या संख्येच्या मूल्यांवर त्यांचे महत्व ठरवण्याची राजकारणी आणि सत्तेची सोईस्कर सवय दीपकेंच्या आंदोलनानंतर राजकारण्यांच्या अंगाशी आली.

सत्तेकडून तरुणांचे आंदोलन अनुल्लेखाने मारण्याचा प्रयत्न झाला, मात्र ते यशस्वी झाले नाही, अखेर आंदोलनामुळे सरकारला नमते घ्यावे लागले. अगदी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामाही घ्यावा लागला, पण त्यानंतरही तरुणाई शांत झालेली नाही. जंतर मंतरवरील आंदोलनानंतर आता सरकारी शाळांची दुरवस्था हा विषय अभिजीत दीपके यांनी हाती घेतला आहे, त्यानंतर लोकांना धक्का बसला आहे. पुरोगामी महाराष्ट्रामध्ये शाळांच्या अशी दुरवस्था झालेली असताना सरकार काय करत आहे, असा सवाल लोक विचारू लागले आहेत. अगदी शाळकरी मुलींनी त्यांच्या गावातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर टाकला, त्यामुळे महाराष्ट्राच्या ट्रिलियन इकॉनॉमीचा छाती ठोक दावा करणार्या मुख्यमंत्र्यांची पंचाईत झालेली आहे.

जंतर मंतरवरील कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनानंतर सरसंघचालक मोहन भागवत यांनी जेन झींशी मंचावरून थेट संवाद साधला. पंतप्रधान मोदींनीही इन्स्टाग्रामवर तरुणाईशी संवाद साधला. आता काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही तरुणाईशी संवाद साधून त्यांना आपलेसे करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. देशातील तरुणाईने सत्ता आणि विरोधकांनाही स्वतःची दखल घेण्याच भाग पाडले आहे. या नव्या दमाच्या तरुणाईचे जात, धर्म, संस्कृती, परंपरा, इतिहासात रमण्यापेक्षा वास्तवातील प्रश्न आणि मुद्द्यांवर अधिक लक्ष आहे. सोबतच संविधानांवर त्यांचा विश्वास असल्याचेही स्पष्ट झाल्याने त्यांची वैचारिक दिशाभूल करणे कठिण असल्याचे सत्ता आणि विरोधकांच्या लक्षात आले आहे. या देशात मनुस्मृती विरोधात संविधान असा संघर्ष भारताच्या प्रजासत्ताकाच्या स्थापनेपासून सुरू आहे. देशातील सत्तेला मनुस्मृतीचे समर्थक ठरवून संविधानाच्या बाजूने राहुल गांधी यांनी झेन जींना आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्न केले. तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी देशातील युवा शक्ती निष्प्रभ करण्यासाठी शत्रुराष्ट्रांचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. परंतु देशातील एवढ्या परिणामकारक युवा शक्तीकडे सत्तेने आणि विरोधकांनी आधी दुर्लक्षच केले होते, हे येथील नेत्यांचे वैचारिक आणि दूरदृष्टिकोनातील मागासलेपणच सिद्ध करते.

राजकीय पक्षांसाठी ही नवी पिढी आता फक्त प्रेक्षक उरलेली नाही, तर सत्तेची गणिते बदलणारी निर्णायक शक्ती बनली आहे. झेन जी ही पूर्णपणे डिजिटल वातावरणात लहानाची मोठी झालेली पहिली पिढी आहे. वृत्तपत्रे किंवा टीव्हीवरील बातम्यांपेक्षा या पिढीचा संपर्क इंस्टाग्राम रील्स, यूट्यूब, एक्स (ट्विटर) आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मशी जास्त आहे. त्यामुळेच, सर्वच राजकीय नेते आता तरुण इन्फ्लुएन्सर्ससोबत पॉडकास्ट करताना किंवा ट्रेंडिंग पद्धतींचा वापर करत आहेत. झेन जीचे राजकीय आणि सामाजिक दृष्टिकोन आदल्या पिढ्यांपेक्षा वेगळे आहेत. या पिढीसाठी फक्त पारंपरिक अस्मिता किंवा आश्वासने पुरेशी ठरत नाहीत. त्यांच्यासाठी करिअरच्या संधी, आयटी क्षेत्रातील घडामोडी आणि रोजगाराची सुरक्षितता, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आधुनिक पायाभूत सुविधांची उपलब्धता, सामाजिक स्वातंत्र्य आणि वैयक्तिक हक्कांबद्दलची जाणीव, हे मुद्दे महत्वाचे आहेत. देशाची सत्ता जुन्या सांस्कृतिक मतवादावर मिळवण्याचे दिवस आता मागे सरत आहेत. राजकीय नेत्यांना हे कळून चुकले आहे की, या पिढीशी संवाद साधण्यासाठी जुनी भाषणे चालणार नाहीत, तर त्यांच्या दैनंदिन प्रश्नांवर थेट बोलावे लागेल.

महाराष्ट्रात आणि देशात स्पर्धा परीक्षांचे रखडलेले निकाल, भरती प्रक्रियेतील घोटाळे आणि रोजगाराचे प्रश्न यांमुळे तरुणांमध्ये मोठा असंतोष निर्माण झालेला दिसतो. हा बदल आपल्या विरोधात जाऊ नये ही धास्ती सत्ताधारी आणि विरोधकांनाही आहे. झेन जी ही पिढी डिजिटल माध्यमातून अत्यंत वेगाने एकत्र येते आणि आपला आवाज उठवते. या पिढीचा राग किंवा पाठिंबा सोशल मीडियाच्या माध्यमातून क्षणात व्हायरल होऊन संपूर्ण राजकीय वातावरण ढवळून काढू शकतो. झेन जीला राजकारणात महत्त्व मिळणे हे केवळ एका निवडणुकीपुरते मर्यादित नसून, हा भारतीय लोकशाहीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या पिढीमुळे राजकीय प्रचाराची भाषा अधिक थेट, डिजिटल आणि संवाद साधणारी बनली आहे. तथापि, ही पिढी केवळ सोशल मीडियावरील प्रचाराला भुलणारी नाही. राजकीय पक्षांनी दिलेली आश्वासने आणि प्रत्यक्ष कामगिरी यातील फरक ही पिढी लगेच ओळखते. त्यामुळेच, सत्तेच्या गणितात टिकून राहण्यासाठी झेन जीच्या आकांक्षांना समजून घेणे ही आजच्या राजकारण्यांसाठी गरज नव्हे, तर सक्ती बनली आहे. पूर्वी निवडणुका बर्याचदा वारसा, पक्षनिष्ठा आणि जाती-धर्माच्या गणितांवर लढवल्या जात असत. परंतु झेन जीने ही समीकरणे बदलण्यास राजकारणाला भाग पाडले आहे. ही पिढी कोणत्याही एका पक्षाशी 'कायमची' बांधील राहत नाही, परंपरा आणि इतिहासापेक्षा या नव्या पिढीला रोजगार, शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय महत्वाचा वाटत आहे. सत्ताधारी आणि विरोधकांनीही तरुणाईला गृहीत धरले ही चूक दोन्हीकडून सुधारली जात आहे, हेही नसे थोडके.

# अमरावतीत डफरीन रुग्णालयातील दुर्घटनेनंतर खळबळ

## माजी मंत्री यशोमती ठाकूर कडून इर्वीन मर्च्युरीत धाव घेत परिस्थितीची केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ अमरावती :** अमरावतीच्या डफरीन रुग्णालयातील एनआयसीयू (छखउण) मध्ये घडलेली भीषण दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक आहे. या दुर्घटनेत काही निष्पाप बालकांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या पालकांवर व कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतर इरवीन रुग्णालयातील मर्च्युरी (जिथे मृतदेह ठेवले जातात ती जागा) परिसरात मृत बालकांच्या पालकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण असून पालक आक्रमक झाले आहेत.याच पार्श्वभूमीवर, राज्याच्या माजी मंत्री यशोमती ठाकूर, अमरावतीचे माजी पालकमंत्री सुनील देशमुख आणि माजी महापौर विलास इंगोले यांनी तातडीने इरवीन रुग्णालयाच्या मर्च्युरीला भेट दिली. यावेळी त्यांनी हंबरडा फोडणाऱ्या पालकांशी संवाद साधून त्यांची



व्यथा व वेदना समजून घेतली.पालकांनी उपस्थित केलेल्या गंभीर प्रश्नांची दखल घेत, या संपूर्ण दुर्घटनेची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका नेत्यांनी मांडली. डफरीन रुग्णालयातील अग्निसुरक्षा व्यवस्था नियमित फायर ऑडिट आणि एकूणच सुरक्षेच्या उपाययोजनांचा पारदर्शक तपास करून, या निष्पाप बालकांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणतीही दयामाया न दाखवता कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.दुर्दैवी बालकांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे नेत्यांनी यावेळी प्रकर्षाने सांगितले.-

# मोर्शी तालुक्यात दोन रेल्वे भुयारी मार्ग मंजूर

## डॉ. अनिल बोंडे यांच्या पाठपुराव्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ मोर्शी -** रेल्वे वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ करण्याच्या दृष्टीने खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून मोर्शी तालुक्यातील कोळविहीर-



विष्णोरा पांदण रस्ता तसेच कोळविहीर - बहिरमपूर पांदण रस्ता या दोन ठिकाणी महत्त्वपूर्ण रेल्वे भुयारी मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. चांदूर बाजार ते नरखेड रेल्वे मार्गामधील कोळविहीर-निंभोरा येथे रेल्वे क्रॉसिंग रोखण्यासाठी कमी उंचीचे सब-वे बांधण्यात येणार आहे. याच सेक्शनमधील कोळविहीर-बहिरमपूर येथेही रेल्वे क्रॉसिंग रोखण्यासाठी कमी उंचीचे सब-वे बांधण्याचे काम प्रस्तावित असून, दोन्ही कामे नागपूर विभागांतर्गत आहेत.या दोन्ही अंडरपासमुळे संबंधित भागातील नागरिकांची रेल्वे रूळ ओलांडताना होणारी गैरसोय कमी होऊन प्रवाशांची व नागरिकांची सुरक्षितता वाढण्यास मदत होणार आहे. खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून अमरावती व परिसरातील रेल्वे पायाभूत सुविधांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. त्यांच्या शिफारसी व पाठपुराव्यामुळे या दोन महत्त्वपूर्ण कामांना गती मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. 'नागरिकांची सुरक्षितता आणि रेल्वे वाहतुकीची सुविधा हीच प्राथमिकता असून, अमरावती व विदर्भातील प्रलंबित रेल्वे प्रश्न मार्गी लावण्यासाठी यापुढेही सातत्याने पाठपुरावा केला जाईल' असे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी सांगितले.

# 'ज्ञान माऊली'च्या माध्यमातून संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा जागर

## अमरावती महसूल विभागातील अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यांमधील सर्व तालुक्यांत एकाच वेळी तालुकास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४ अमरावती,** १४संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जन्मजयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने अमरावती महसूल विभागातील अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यांमधील सर्व तालुक्यांमध्ये एकाच वेळी तालुकास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत 'ज्ञान माऊली' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता अमरावती विभागाअंतर्गत अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये आयोजित करण्यात आला आहे.संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या अलौकिक साहित्यनिर्मिती, अध्यात्मिक विचार आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक जीवनावर अमीट ठसा उमटविला. ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव या ग्रंथांच्या माध्यमातून त्यांनी अध्यात्मज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविले. त्यांच्या समतावादी, मानवतावादी आणि भक्तिमार्गाच्या विचारांचा वारसा आजही समाजाला प्रेरणा देत




आहे.संत ज्ञानेश्वर माऊलींच्या जीवनकार्याचा, अध्यात्मिक विचारांचा आणि संतपरंपरेतील योगदानाचा परिचय जनसामान्यांना करून देण्याच्या उद्देशाने 'ज्ञान माऊली' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वरांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग, संतविचार, भक्तीपरंपरा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन रसिकांना घडणार आहे.संत ज्ञानेश्वरांच्या ७५० व्या जन्मजयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, संतपरंपरेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, संतांच्या विचारांचे जतन व संवर्धन करणे आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची जनमानसात व्यापक ओळख निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.अमरावती महसूल विभागातील सर्व तालुक्यांमध्ये एकाच वेळी तालुकास्तरीय कार्यक्रम आयोजित करून संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा आणि संतपरंपरेचा व्यापक प्रसार करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येत आहे. या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना संत ज्ञानेश्वरांच्या अध्यात्मिक व सांस्कृतिक वारशाशी जोडण्याची संधी उपलब्ध होणार आहे.हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे.'ज्ञान माऊली' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमास विनामूल्य प्रवेश असून, अमरावती विभागाअंतर्गत अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विचारांचा अनुभव घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्री प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

# स्मशानभूमी बनली मानसिक शांतीचे केंद्र

## निसर्गरम्य वातावरण व आकर्षक सौंदर्यीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४वरुड**

गाव खेड्यात वेशीवर निर्जन भागांत मानवी देहावर अंतिम संस्कार करण्यात येतात. परंतु, तालुक्यातील ग्राम लोणी येथील स्मशानभूमीत गावाकडे परतणारी माणसेसुद्धा मानसिक शांतीसाठी येतात. मसणवट, मृत्यूलोक, भूत, पिशाच्च असे काहीसे शब्द स्मशानभूमीसाठी वापरले जातात. परंतु, लोणीच्या काही समाजसुधारकांनी एकत्रित येत या भीती निर्माण करणाऱ्या शब्दांना या स्मशानभूमीतुन हद्दपार केले आहे. लोकवर्गणीतून साकारलेल्या स्वर्गापेक्षाही सुंदर मोक्षधामात भीती नाही तर शांती मिळत असल्याचा अनुभव कित्येकांनी आपल्या बोलून दाखविला असून लोणीचे मोक्षधाम हे मानवमंदिर, प्रबोधनाचे



केंद्र आहे, असे म्हटल्या जाते. निसर्गरम्य वातावरणात स्वर्गापेक्षाही सुंदर असे मानवाचे अंतिम स्थान असावे या विचाराने प्रेरित होत लोणी स्मशानभूमीत हा कायापालट करण्यात आला आहे.

माणसाने पै-पै जमवून संपत्ती गोळा केली. मोठा झाला, प्रतिष्ठा आली. मात्र, अन्त्यसंस्काराची वेळ आल्यावर गावाच्या वेशीवर किंवा नदीच्या काठावर निर्जन स्थळी नेऊन अग्निसंस्कार केले जातात. या सरकारी जागेत दफनविधी करून नात्यागोत्यातील सगेसोयरे, मित्रपरिवार श्रद्धांजली वाहून मोकळे होतात. मात्र, लोणी येथील मोक्षधाममधील स्वर्गलोकाचे दर्शन घडविणाऱ्या निसर्गरम्य वातावरणाने कुणालाही निरोप घ्यावासा वाटणार नाही.

वासुदेव पोहरकर यांच्या नेतृत्वात सर्व समाजसुधारकांनी एकादशी व सणासुदीच्या दिवसाला एकत्रित येत हळूहळू लोकवर्गणी गोळा केली व श्रमदानातून स्वर्गापेक्षाही सुंदर मोक्षधाम निर्माण केला. येथे मानवी जीवनाचा संदेश देण्याकरिता महामानवांच्या मूर्ती स्थापित करण्यात आल्या आहे. विविध प्रकारचे वृक्ष-वेली, फुलझाडे लावली आहेत. या मोक्षधामात चिताग्नी देणाऱ्यांकरिता शॉवर बसविण्यात आले आहे. संगीतमय वातावरणात श्रद्धांजली वाहिली जाते. संत तुकाराम महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या प्रबोधनकारी विचारांच्या मानवी जीवनाचा अर्थबोध करणाऱ्या म्हणीतून जीवनातील सत्याचे आकलन करण्यात येते.

# अमरावतीत दोन दिवस पाऊस बरसणार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४ अमरावती** - अमरावती जिल्ह्यात २५, २६ व २७ ऑगस्ट रोजी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. यवतमाळ अकोला येथेही जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. दोन दिवस राज्यातील काही



भागांत हलका ते मध्यम, तर काही ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भातील काही भागांत पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी याबाबत माहिती दिली आहे. त्यांच्या माहितीनुसार, अमरावती सह अकोला, वाशिम, बुलडाणा आदी भागात पावूस पडण्याची शक्यता आहे. मागील काही दिवसांपासून पावसाने ब्रेक दिल्यामुळे सर्वत्र चिंतेचे वातावरण पसरले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार विदर्भातील काही भागांत इतर भागांच्या तुलनेत पाऊस अधिक होण्याची शक्यता आहे. यंदाच्या वर्षी सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. ऑगस्ट महिना संपत आला असून, या महिन्यातही पावसाने पाठ फिरवली आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण आहे. तसेच धरणांमधील जलसाठ्यातही पाहिजे त्या प्रमाणात वाढ झालेली नाही. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.-

# शुन्य वीज अपघाताचे ध्येय कायम समोर ठेवा

## महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ अमरावती-** विद्युत अपघातामुळे कमावत्या व्यक्तिचा प्राणांतिक अपघात झाल्यास त्याच्या कुटुंबातील तीन पिढ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाज करताना सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे आणि कोणत्याही परिस्थितीत विद्युत अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी केले आहे. विद्युत भवन येथे शुक्रवारी (ता.२१) जिल्ह्यातील जनमित्रांना प्रातिनिधिक स्वरूपात सुरक्षा साहित्याचे वाटप संचालक पवार यांच्या हस्ते करण्यात आले,



त्यावेळी ते बोलत होते. सांघिक कार्यालयाने केंद्रीय स्तरावर खरेदी करून सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांना दर्जेदार सुरक्षा साहित्य पुरवले आहे. त्याचा उपयोग करून ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीज पुरवठ्यासाठी कटिबद्ध राहण्याची सूचनाही त्यांनी केली. यावेळी मुख्य अभियंता दिलीप दोडके (अमरावती), दत्तात्रय बनसोडे (अकोला), अधीक्षक अभियंता दिपक देवहाते व राजेश घाटोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संचालक श्री. पवार यांनी मानव संसाधन विभागाची सविस्तर आढावा बैठक घेतली. व्यवस्थापनाच्या विविध कल्याणकारी योजना प्रत्येक कर्मचाऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी तत्परतेने काम करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. तसेच कर्मचाऱ्यांचे सर्व प्रलंबित दावे, पदोन्नती पॅनल्स आणि शिस्तभंग कारवाईशी संबंधित प्रकरणांचा निर्धारित वेळेत वेगाने निपटारा करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या. महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना वीज सेवेशी निगडीत काम करतांना त्यांचे मनोधैर्य उंच राखण्याकरीता आणि कर्मचाऱ्यांच्या सर्व समस्या निकाली काढून सुविधांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचविण्याकरीता अमरावती परिमंडळ मानव संसाधन विभागामार्फत उपलब्ध करून दिलेल्या विशेष व्हॉट्स ॲप सेवेचा शुभारंभ संचालक श्री. पवार यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला. संचालक (मानव संसाधन) यांचे तांत्रिक सहाय्यक डॉ.संतोष पाटणी यांनी कार्यक्रमा मागची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख यांनी केले. सुत्रसंचालन व्यवस्थापक विकास बांबल यांनी, तर आभार उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर यांनी मानले. या कार्यक्रमला कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे, विजयकुमार कासट, संजय शृंगारे, रविंद्र वांदिले, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी निशिकांत राऊत, व्यवस्थापक कल्पना भुले यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# लाडू कारखान्याला परवानगी नाहीच FDAचा दणका, कारखान्याला ठोकले सील

## अस्वच्छतेचा कळस; तुटलेल्या भिंती, जळालेल्या टिनशेडमध्ये मोतीचूर लाडूंची निर्मिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती :**

शहरातील विविध स्वीट मार्टमध्ये विक्रीसाठी पाठविण्यात येणाऱ्या मोतीचूर लाडूंच्या निर्मितीमागची धक्कादायक अस्वच्छता अन्न व औषध प्रशासनाच्या (ऋऊ-) कारवाईत उघडकीस आली आहे. रामपुरी कॅम्प परिसरातील पिंटू यादव यांच्या मालकीच्या लाडू कारखान्यावर ऋऊ-च्या पथकाने धाड टाकून गंभीर अनियमितता उघड केली. विशेष म्हणजे, या प्रतिष्ठानाकडे अन्न व्यवसायासाठी आवश्यक कोणताही वैध परवाना नसल्याचे तपासणीत समोर आले. त्यानंतर प्रशासनाने कारखान्याचे कामकाज बंद करून कारखान्याला सील ठोकले.ऋऊ-च्या पथकाला लाडू तयार होणाऱ्या परिसरात अक्षरशः अस्वच्छतेचा कळस पाहायला मिळाला. तुटलेल्या भिंती, जळालेल्या टिनशेडमध्ये





खाद्यपदार्थांची निर्मिती सुरू होती. परिसरात मोठ्या प्रमाणात भंगार पडून होते. अशा वातावरणात तयार होणारे मोतीचूर लाडू शहरातील अनेक स्वीट मार्टमध्ये ग्राहकांच्या विक्रीसाठी पोहोचविले जात असल्याचे समोर आले आहे.धक्कादायक बाब म्हणजे, या लाडूंवर कोणतेही आवश्यक लेबलिंग नसल्याचेही अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. अन्नपदार्थ निर्मिती व विक्रीसंदर्भातील भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या नियमांचे पालन होत नसल्याचे तपासणीत स्पष्ट झाले.या कारखान्यातून ऑर्डरनुसार मोठ्या प्रमाणात मोतीचूर लाडू तयार करून शहरातील विविध स्वीट मार्ट मध्ये पुरविले जात असल्याने ग्राहकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. स्वच्छतेच्या मूलभूत नियमांची पायमल्ली करून तयार केलेले हे लाडू ग्राहकांच्या ताटात पोहोचत असल्याने प्रशासनाच्या कारवाईनंतर आता या लाडूंच्या सुरक्षिततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.ऋऊ-चे सहायक आयुक्त विनय चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, रामपुरी कॅम्प परिसरातील या प्रतिष्ठानाची तपासणी केली असता कोणताही परवाना आढळून आला नाही. तसेच प्रचंड अस्वच्छता आढळल्याने तेथील काम बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.शहरभर मोतीचूर लाडूंचा पुरवठा करणाऱ्या या कारखान्यावर झालेल्या कारवाईमुळे खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या स्वच्छता व परवाना व्यवस्थेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ऋऊ- आता अशा इतर कारखान्यांवरही कारवाई करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# नवसारी च्या गोदाम वरून २० लाखाचा ३८५ क्विंटल धान्यसाठा जप्त

## विना परवाना साठा ; अजय साहू विरोधात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती** गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत नवसारी वलगाव रोडवरील पावर हाऊससमोर एका गोदामात अवैधरित्या साठवून ठेवलेला ३८५ क्विंटल धान्यसाठा जप्त करण्यात आला. या धान्याची किंमत २० लाख रुपये असून, याप्रकरणी एका जणाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्नधान्य वितरण अधिकारी प्रवीण उत्तमराव राऊत (४२) यांनी ही मोठी कारवाई केली. शनिवारी उशिरा रात्री गाडगेनगर पोलिस-ंनी याप्रकरणी आरोपी आरोपी अजय झुनिलाल साहू (६५, रा मसानगंज) याविरुध्द गुन्हा दाखल केला. नवसारी येथील जमीर मन्सुरी यांच्या नावावर असलेल्या खासगी गोदामात हा अवैध धान्यसाठा जमा केलेला होता. संबंधीत व्यक्तीजवळ कोणताही परवाना नव्हता, तरीही त्याने एवढ्या मोठ्या प्रमाणात धान्य साठवून ठेवले होते. १७ ऑगस्टला संध्याकाळी ६ वाजता अधिकाऱ्यांनी या गोदामाची



### दोन ट्रक भरुन धान्य जप्त

गोदामातून जप्त केलेले धान्याचे दोन ट्रकमध्ये भरुन वजन करण्यात आले. पहिल्या ट्रकचे वजन ३०६.५० तर खाली ट्रकचे वजन ९४.९० नोंदवण्यात आले. दुसऱ्या ट्रकचे प्लास्टीक पोत्यांसह वजन २११.६० क्विंटल एवऐ होते. यातील तांदूळाची किंमत १४ लाख रुपये होती. दुसऱ्या ट्रकचे वजन २६३.२० तर खाली ट्रकचे वजन ८९.८० नोंदवण्यात आले. दोन्ही वाहनांमध्ये एकूण ३८५ क्टिल धान्य होते.

तपासणी केली. तपासणीदरम्यान गोदामात रंगबिरंगी प्लास्टीकच्या पोत्यात २५ टन तांदूळ (२५० किलो), आणि सहा टन गहू (६० क्विंटल) एवढे धान्य आढळून आले. हे धान्य ३ हजार चौरसफुटच्या गोदामात ठेवले होते. अधिकाऱ्यांनी आरोपी अजय साहू यांना बील, स्टॉक रजीस्टर, परवाना, आणि विक्री रजीस्टर मागीतले. मात्र आरोपी हे कागदपत्र सादर करु शकला नाही. चौकशीत त्याने सांगितले की, इतवारा बाजारातून धान्याचीचिल्लर खरेदी तो करतो. मात्र नियमांचे पालन न केल्यामुळे गाडगेनगर पोलिसांनी आरोपी अजय झुनिलाल साहू याविरुध्द अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा दाखल केला.

धान्याच्या नमुने तपासणीला पाठवले गोदामात ठेवलेल्या तांदळाच्या तपासणीदरम्यान त्यामध्ये फोर्टिफाइड राइस करनेलचे कण आढळून आले.

त्यामुळे हे तांदूळ सरकारी धान्य दुकानांशी संबंधीत असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तांदूर आणि गव्हाचे नमुने तीन प्रतीत घेण्यात आले.एक प्रत आरोपीला देण्यात आली असून, तपासणीकरिता धान्याचे नमुने प्रयोगशाळेतही पाठविण्यात आले आहेत.

# मार्टी तसेच वक्फ बोर्डचे विभागीय मुख्यालय मौंजे नवसारीत साकार होणार उर्दू घर

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून मंजुरी, आ. सुलभा खोडके यांच्या प्रयत्नांना यश

### तिनही कार्यालये येणार एकाच छताखाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

अमरावतीच्या मौजे नवसारी भागात उर्दू घर, अल्पसंख्यक संशोधन आणि प्रशिक्षण संस्था ( मार्टी) तसेच वक्फ बोर्डचे विभागीय मुख्यालय साकार होणार असून, याला मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

अमरावती जिल्हा तसेच विभागाच्या अल्पसंख्यंक समाजातील शिक्षा आणि सामाजिक विकासाकरिता हे महत्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. याविषयी आ सुलभा खोडके यांनी सातत्याने शासनाकडे याप्रकरणी पाठपुरावा केला होता. त्यामुळे या निर्णयानंतर आ सुलभा खोडके यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविषयी आभार व्यक्त केले आहेत. सारथी, बार्टीच्या धर्तीवर अमरावतीतमध्ये मार्टी म्हणजेच अल्पसंख्यक संशोधन एवं प्रशिक्षण संस्था का विभागीय कार्यालयाला मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. अमरावतीमध्ये सर्व स्तरातील नागकिरांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने हे केंद्र लवकरात लवकर कार्यान्वीत होण्याकरिता जागेच्या संदर्भात हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. अमरावती शहरातील अल्पसंख्यंक समाजाची मोठी संख्या लक्षात घेता, येथे समाज हित तसेच विकासाच्या उद्देशाने तसेच अल्पसंख्यक समाजातील शैक्षणिक प्रगती, आर्थिक विकास लक्षात घेवून उर्दू घर, अल्पसंख्यंक संशोधन आणि अशिक्षण संस्था मार्टी, तसेच वक्फ बोर्डाचे विभागीय कार्यालय साकार करणे आवश्यक आहे. याकरिता मौजे नवसारी स्थित ई क्लास





सर्वे नंबर ९७/२ अंतर्गत १.४२ हेक्टर ही जागा उपलब्ध आहे. याआधी ही पूर्व सारथी संस्थेला नियोजन विभागाकडून प्रदान करण्यात आली होती. परंतु आता ही जागा उर्दू घर, मार्टी तसेच वक्फ बोर्डाचे विभागीय कार्यालयाकरिता हस्तांतरीत करण्यावर अमरावतीमध्ये अल्पसंख्यक समाजाच्या विकासाकरिता हे तिनही महत्वपूर्ण कार्यालय एकाच छताच्या खाली स्थापीत करुन या प्रकल्पांना गती देणे शक्य होणार आहे. याकरिता आ सुलभा खोडके यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन देण्यात आले होते. यासंदर्भात सरकारकडे प्रस्तावही पाठविण्यात आला होता.

**हस्तांतरणाचे आदेश जारी**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून नवसारी स्थित ई क्लास सर्वे नंबर ९७/२ च्या अंतर्गत १-४२ हेक्टर आर ही जागा उर्दू घर, मार्टी तसेच विभागीय वक्फ बोर्ड कार्यालय सारख्या प्रकल्पासाठी हस्तांतरीत करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहे. यामुळे आता या माध्यमातून उर्दू भाषा साहित्य, कलेचा प्रचार आणि प्रसार, मार्टी संस्थाद्वारा वसतीगृह, अभ्यासिका, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन आणि प्रशिक्ष या सुविधा उपलब्ध होणार असून, सर्वांगिण विकासाला गती मिळणार आहे.

# एवढी आग होती, जीवाची पर्वा न करता लेकरांना बाहेर काढलं

## परिचारिकांनी सांगितला थरार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू कक्षात सोमवारी पहाट लागलेल्या भीषण आगीत तीन बालकांचा मृत्यू झाला आहे. तर सहा बालकांना बाहेर काढण्यात आले असले तरी त्यापैकी काही बाळांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्यावर शेजारी असणाऱ्या सुपरस्पेशालिटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

नवजात शिशू कक्षात सोमवारी पहाटे व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन ही आग लागली. ही आग वेगाने पसरत गेली. आग लागल्याचे लक्षात आल्यानंतर दोन परिचारिकांच्या प्रसंगावधानामुळे या कक्षात असलेल्या सहा बाळांचा जीव वाचल्याची माहिती आता समोर येत आहे. या दोन परिचारिकांनी इवल्याशा बाळांसाठी अक्षरश: स्वत:च्या जीवाची पर्वा न करता या बाळांचा जीव वाचवला.या दोन परिचारिकांनी या सगळ्या घटनेबाबत माहिती सांगितली . त्यांनी म्हटले की, आम्हाला समोर फक्त लहान मुलं दिसत होती. आग खूपच भीषण होती. मात्र, आम्ही आम्हाला काय होईल याचा विचार केला नाही. आम्ही या कक्षात ठेवण्यात आलेल्या पेटीतील बाळांना बाहेर काढले. आम्ही खूप प्रयत्न केले. मात्र, या कक्षात आगीमुळे सर्वत्र धूर पसरला होता. आम्हाला काहीच दिसत नव्हते. त्यामुळे तीन बाळांना वाचवता आले नाही. बाळांना वाचवताना आगीमुळे आमचे हात भाजले. या परिचारिकांनी त्यांचे भाजलेले हात सुद्धा यावेळी दाखविले.

# स्त्री रुग्णालय दुर्घटना: आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्याकडून तीव्र शोक व्यक्त

## ...ही राजकारणाची वेळ नाही, दु:खात होरपळणाऱ्या कुटुंबांना धीर देण्याचा हा क्षण आहे - प्रवीण पोटे पाटील...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती:** अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील (डफरीन) नवजात शिशू अतिदक्षता विभागात (डछ्उण) लागलेल्या भीषण आगीत बालकांचा झालेला दुर्दैवी मृत्यू अत्यंत वेदनादायी, मन हेलावून टाकणारा आणि तितकाच धक्कादायक आहे. या अत्यंत दुर्दैवी घटनेवर भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि विधान परिषदेचे आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी अतिशय संवेदनशील शब्दात तीव्र दु:ख व शोक व्यक्त केला आहे. या कठीण प्रसंगी आरोप-प्रत्यारोपांची किंवा राजकारण करण्याची मुळीच नाही.ज्या माता-पित्यांनी आपली चिमुकली बाळे गमावली आहेत, त्यांच्या तीव्र वेदनांची भरपाई कशानेही होऊ शकत नाही. मी वैयक्तिकरीत्या आणि एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून या दु:खात पूर्णपणे त्यांच्या पाठीशी उभा आहे.या घटनेतील मृत बालकांच्या नातेवाईकांना तसेच सध्या उपचाराधीन असलेल्या जखमी बालकांना सर्वोत्कृष्ट वैद्यकीय सुविधा मिळवून देण्यासाठी वैयक्तिक पातळीवर आणि राज्य सरकारच्या वतीने सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.चौकशीनंतर या घटनेतील त्रुटी आणि आगीचे नेमके कारण समोर



येईलच. भविष्यात अशा भयानक आणि दुर्दैवी दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी राज्य सरकार रुग्णालयांच्या सुरक्षेबाबत अत्यंत कठोर आणि दीर्घकालीन उपाययोजना अंमलात आणेल. हा क्षण टीकेचा किंवा राजकीय चिखलफेकीचा नाही, तर एक जबाबदार आणि संवेदनशील नागरिक म्हणून पीडित कुटुंबांना धीर देण्याचा आहे. सध्या आमचे संपूर्ण लक्ष जखमी बालकांना त्वरित उपचार मिळवून देणे आणि पीडित पालकांना मानसिक व व्यावहारिक आधार देण्यावर केंद्रित आहे, असेही आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी सांगितले.-

## तीन बालकांच्या मृत्यूप्रकरणी

# दोषींवर कठोर कारवाईची प्रवीण हरमरकर यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती :**

जिल्हा सामान्य स्त्री रुग्णालय (डफरीन) येथे तीन नवजात बालकांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शहरप्रमुख तथा माजी विरोधी पक्षनेते प्रवीण वसंतराव हरमकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.रुग्णालयातील व्हेंटिलेटर व इतर जीवनरक्षक मशिनरीच्या देखभाल-दुरुस्तीत संबंधित अभियंता अथवा तांत्रिक अधिकाऱ्यांकडून निष्काळजीपणा झाला असल्यास त्याचीही सखोल चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई न करता या यंत्रणांची तपासणी व देखभालीची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांची भूमिका निश्चित



करण्याची मागणी हरमकर यांनी केली.या प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी समितीमार्फत चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करावी, तसेच मृत बालकांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत व न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. 'एक मुंगी न मारता मुंग्यांचे वारूळ पकडले पाहिजे' या न्यायाने घटनेच्या मूळ कारणापर्यंत जाऊन जबाबदारी निश्चित झाली पाहिजे, अशी भूमिका हरमकर यांनी मांडली.-

# बदलत्या शैक्षणिक परिस्थितीनुसार प्राध्यापकांनीही बदलावे- प्रा. एस.पी.लवांडे

## नुटा बुलेटिनचा सुवर्णमहोत्सव उत्साहात, हजारो प्राध्यापकांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती :** कोरोना नंतर महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची वाढलेली अनुपस्थिती चिंताजनक असून पारंपरिक घोकमपट्टीऐवजी अध्यापनात आधुनिक बदल स्वीकारण्याची गरज आहे. परीक्षा पद्धतीतील शिथिलता आणि विना-अनुदानित संस्थांचा वाढता प्रभाव यांमुळे शिक्षण क्षेत्रासमोर मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. या बदलत्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व प्राध्यापक वर्ग व संघटनांनी संघटित राहून प्रामाणिक आत्मपरीक्षण करावे, असे आवाहन प्रा.एस.पी.लवांडे यांनी केले. नागपूर विद्यापीठ टिचर्स असोसिएशन(नुटा)च्या नुटा बुलेटिनच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात नुटाच्या पाच दशकांच्या संघर्षमय आणि वैचारिक वाटचालीचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष प्रा. एस. पी. लवांडे होते. प्रमुख वक्ते अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे माजी महासचिव प्रा. अशोक बर्मन, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. फिरदोस मिर्झा, एमफुक्टोचे सरचिटणीस डॉ. आर. के. चव्हाण, नुटाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण रघुवंशी व सरचिटणीस डॉ. नितीन कोंगरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगेबाबा व प्रा. बी. टी. देशमुख यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाला भावनिक स्वरूप प्राप्त झाले. नुटा बुलेटिनचा जन्म आणीबाणीच्या काळातील संघर्षातून झाला असून १९७६ मध्ये हस्तलिखित स्वरूपात त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. त्या काळातील सेन्सॉरशिप, संघटनेचे संघर्ष आणि प्राध्यापकांच्या




हक्कांसाठी झालेल्या आंदोलनांची माहिती यावेळी देण्यात आली. नुटा बुलेटिनने केवळ संघटनेचे मुखपत्र म्हणून नव्हे, तर प्राध्यापकांपर्यंत माहिती पोहोचविणारे, त्यांच्या हक्कांविषयी जागृती निर्माण करणारे आणि न्यायालयीन लढ्यांमध्ये महत्त्वपूर्ण दस्तऐवज म्हणून काम केले असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी नुटा बुलेटिनने विदर्भातील प्राध्यापकांमध्ये संवाद, जागृती आणि संघटन मजबूत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे सांगितले. यावेळी सातवा वेतन आयोग, ७१ दिवसांचा थकीत वेतनाचा लढा, शिक्षकांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीचा प्रश्न तसेच स्टॅच्युट ५३ च्या माध्यमातून शिक्षकांना मिळालेले संरक्षण यांसाठी प्रा. बी. टी. देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या संघर्षाचे स्मरण उपस्थितांना करवून दिले. या कार्यक्रमात नुटा बुलेटिनच्या सुवर्णमहोत्सवी विशेषांकाचे, तसेच प्रा. बी. टी. देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रकाशित 'संघर्ष यात्रेतील दीपस्तंभ' या विशेषांकाचे विमोचन करण्यात आले. डॉ. किशोर फुले यांनी लिहिलेल्या प्रा.बि.टी. देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वावर लिहिलेल्या लेखांचे 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती' या पुस्तकाचेही प्रकाशन झाले. नुटा बुलेटिनच्या दीर्घ प्रवासात योगदान देणाऱ्या नानासाहेब बोके, अविनाश देशमुख व सूरज डिके यांचा विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

एमफुक्टोचे सरचिटणीस डॉ. आर. के. चव्हाण यांनी नव्या पिढीने नुटा बुलेटिनचे अंक वाचून शिक्षकांच्या हक्कांसाठी झालेला संघर्ष समजून घ्यावा, असे सांगितले. वेतन वितरण व्यवस्था, स्टॅच्युट ५३, वैद्यकीय प्रतिपूर्ती, जुनी पेन्शन योजना आदी प्रश्नांसाठी झालेल्या संघर्षाचा बुलेटिन हा महत्त्वपूर्ण दस्तऐवज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासनाकडून माहिती मिळविण्यासाठी विधिमंडळातील प्रश्न, दप्तर दिरंगाईविरोधी कायदा आणि माहितीच्या अधिकाराचा प्रभावी वापर करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. तसेच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. फिरदोस मिर्झा यांनी नुटा बुलेटिन हे केवळ माहिती देणारे माध्यम नसून माहितीचे ज्ञानात रूपांतर करणारे प्रभावी साधन असल्याचे सांगितले.

# जिल्हा स्त्री रुग्णालयातील घटनेवरून सुप्रिया सुळेंचा सरकारवर संताप

## हा केवळ अपघात नाही, तर..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

अमरावतीमधील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवीन इमारतीत नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) सोमवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या घटनेत ३ नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर राज्यभरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.



अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवजात शिशू अतिदक्षता विभागात अचानक आग लागल्याची घटना घडल्यानंतर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी काही बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढलं. तसेच आगीवर लगेच नियंत्रणही मिळवलं. मात्र, तोपर्यंत दुर्दैवाने तीन बालकांचा धुरामुळे गुदमरुन मृत्यू झाला.

दरम्यान, अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयात घडलेल्या या घटनेवर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत या घटनेवरून सरकारवर संताप व्यक्त केला आहे. अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात घडलेल्या या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच 'हा केवळ एक अपघात नाही, तर व्यवस्थेतील गलथानपणाचा नमुना आहे', अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी सरकारवर टीका केली आहे.हळहळ व्यक्त केली जात आहे.

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात एनआयसीयू विभागातील व्हेंटिलेटरमध्ये स्फोट झाल्याने लागलेल्या आगीत ३ नवजात अर्भके मृत्युमुखी पडली, तर आणखी काही गंभीर आहेत. ही अतिशय हृदयद्रावक घटना आहे. आई-वडील आपल्या बाळाची आतुरतेने वाट पाहत असतात, पण त्याच बालकाला अशा पद्धतीने गमवावे लागले. त्यामुळे आई-वडिलांवर काय प्रसंग ओढवला असेल याची कल्पनाही करता येत नाही. हा केवळ एक अपघात नाही तर व्यवस्थेतील गलथानपणाचा नमुना आहे, असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात छखउण विभागातील व्हेंटिलेटरमध्ये स्फोट झाल्याने लागलेल्या आगीत ३ नवजात अर्भके मृत्युमुखी पडली तर आणखी काही गंभीर आहेत. हि अतिशय हृदयद्रावक घटना आहे. आई-वडील आपल्या बाळाची आतुरतेने वाट पाहत असतात पण त्याच बालकाला अशा पद्धतीने गमावावे लागले तरया संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कठोरात कठोर कारवाई करावी. या बरोबरच महाराष्ट्रातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांचे फायर ऑडिट तसेच वैद्यकीय साधनांचे सेफ्टी ऑडीट देखील करण्याची गरज आहे.

या घटनेत आपली मुलं गमावलेल्या कुटुंबांच्या प्रती मी संवेदना व्यक्त करते. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली. जखमी अर्भके लवकरात लवकर बरी होऊन आईच्या कुशीत परतावी, ही ईश्वरचरणी प्रार्थना, असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

# 'आमचे बाळ परत आणून द्या'; रुग्णालयात मातांचा आक्रोश पाहून समाजमन सुन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. तिसऱ्या माळ्यावरील नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) पहाटे साडेतीन वाजता व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. अवघ्या चार ते दहा दिवसांच्या या बाळांना जग पाहण्याआधीच जीव गमवावा लागला. मृत बाळांच्या पालकांचा हृदय पिळवटून टाकणारा रुग्णालय परिसरात पाहायला मिळत आहे. 'आपल्या पोटचं बाळ आता या जगात नाही, आमची लेकरं गेली' असे म्हणत मृत बाळांच्या मातांनी टाहो फोडला. मृत बालकांना शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्याची प्रक्रिया सुरू होताच बाळांच्या नातेवाईकांनी त्याला विरोध सुरू केला. 'आमचे बाळ आम्हाला परत द्या', 'बाळाला पोस्ट मॉर्टेमसाठी घेऊन जाऊ नका', अशी आर्त विनवणी करीत कुटुंबीयांनी हंबरडा फोडला. आगीची घटना घडली, तेव्हा 'एसएनसीयू'त नऊ बालके होती. अचानक धूर पसरला. या बालकांना परिचारिकांनी वेळीच प्रसंगावधान राखून बाहेर काढले, पण तीन बालकांचा मृत्यू झाला होता. सहा बालकांवर इतर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



### अवघ्या ४ ते १० दिवसांचे बाळ..

'एसएनसीयू'त कमी वजनाच्या आणि गंभीर अवस्थेतील बालकांवर उपचार करण्यात येतात. या दुर्घटनेत बोराळा, ता. चिखलदरा येथील मातेची नवजात मुलगी, पुलगाव, जि. वर्धा, तसेच खेड, ता. अंजनगाव सुर्जी येथील मातांची दोन नवजात मुले दगावली आहेत. अवघ्या ४ ते १० दिवसांच्या या बालकांना रुग्णालयाबाहेरचे जगही पाहता आले नाही. बाळांच्या कुटुंबीयांचा आक्रोश पाहून समाजमन सुन्न झाले होते.

# तर सरकारी रुग्णालयांवर विश्वास राहणार नाही!

## नवनीत राणा यांनी व्यक्त केले दु:ख, अश्रू अनावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवीन इमारतीतील नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) सोमवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या दुर्देवी घटनेत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी रुग्णालयात पोहचून मृत बालकांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले. पत्रकारांशी बोलताना त्यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केले. भविष्यात अशा घटना घडायला नको, अन्यथा सरकारी रुग्णालयांवर लोकांचा विश्वास राहणार नाही, असे त्या म्हणाल्या.



नवनीत राणा म्हणाल्या, व्हेंटिलेटरचा स्फोट झाल्यामुळे ही आग लागल्याचे सांगितले जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. आग लागल्यानंतर अग्निशन यंत्रणा का कार्यान्वित झाली नाही. स्प्रिंकलर्स का सुरू झाले नाहीत. या रुग्णालयाचे फायर ऑडिट झाले होते का, याची चौकशी केली जाईल. जे दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. हलगर्जीपणामुळे ही दुर्घटना झाली असेल, तर संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. असे प्रकार भविष्यात घडता कामा नये. गरीब कुटुंबातील महिलांना जिल्हा स्त्री रुग्णालयाचा आधार आहे. दोन वर्षांपुर्वीच रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन झाले. तरीही अशा प्रकारची दुर्घटना होते, हे दुर्देवी आहे. आपण या प्रकरणाची चौकशी करण्याची आणि दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी मंत्र्यांकडे केली आहे. कुणालाही सोडले जाणार नाही. असेच प्रकार घडत राहिले, तर गरिबांचा सरकारी रुग्णालयावरील विश्वास उडून जाईल, असे नवनीत राणा म्हणाल्या.

### नवनीत राणा यांना अश्रू अनावर

नवनीत राणा यांनी मृत बालकांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यावेळी त्यांचे सांत्वन करताना नवनीत राणा यांना अश्रू अनावर झाले. सरकार आपल्या पाठीशी आहे, असे त्या म्हणाल्या. तीन बाळांचे जीव जातात, ही अत्यंत वेदनादायक गोष्ट आहे. रुग्णालयात चांगल्या सुविधा मिळाव्यात ही सर्वसामान्य लोकांची अपेक्षा आहे. सरकार पायाभूत सुविधा उभारण्यासाठी तयार आहे. प्रशासनाने वेळीच प्रस्ताव सरकारकडे पाठवायला हवेत. दिरंगाई करता कामा नये. जिल्हा स्त्री रुग्णालयाची खाटांची क्षमता वाढविण्यासाठी आम्ही पाठपुरावा करू, पण प्रशासनाने रुग्णांच्या आरोग्याशी खेळ करू नये, असे नवनीत राणा म्हणाल्या.

# अनुदानित आश्रमशाळांमध्ये आता परिचारिका

## विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी उपाययोजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

विद्यार्थ्यांच्या आरोग्य संदर्भात समस्या लक्षात येऊन त्यांना तातडीची मदत व्हावी म्हणून शासकीय आदिवासी आश्रमशाळांप्रमाणेच अनुदानित आश्रमशाळांमध्येही परिचारिकांची (ए.एन.एम.) पदे भरावीत यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. अमरावती जिल्ह्याचा विचार केल्यास १८ शासकीय आणि २१ अनुदानित आश्रमशाळा आहेत. त्यात २४ हजाराच्या आसपास विद्यार्थी शिक्षण घेतात. डोमासह इतर आश्रामशाळांमध्ये उद्भवलेल्या समस्येनंतर विभागाकडून काही पावले उचचल्या जात असल्याचे दिसून येते. राज्याच्या आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांनी त्याला दुजोरा दिला. महाराष्ट्रामध्ये ५०० शासकीय आणि ५५० अनुदानित आश्रमशाळा असून, त्यामध्ये अंदाजे ४ लाखांच्या आसपास विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गत काही दिवसांमध्ये आश्रमशाळांमध्ये ज्या घटना- घडामोडी घडल्या, त्यानंतर विद्यार्थ्यांकरिता हेल्थ आणि हायजिन हा विषय शासन आणि प्रशासनाच्या प्राथमिक अजेंड्यावर आलेला आहे. त्यामुळे शासकीय आश्रमशाळांप्रमाणेच अनुदानित आश्रमशाळेमध्ये परिचारिकांची पदे भरल्या जावीत याकरिता आदिवासी विकास विभागाच्या वतीने आकृतिबंध तयार करण्यात आला आहे. आरोग्याची प्राथमिक स्तरावरही काळजी त्यामुळे घेतल्या जाईल. असेही श्रीमती बनसोड यांनी सांगितले.

शिक्षणासाठी उत्तम सुविधा विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न सुरु आहे. शिक्षणासोबतच त्यांचे आरोग्य सुदृढ असणेही आवश्यक असल्यामुळे शासनाकडून अनुदानित आश्रमशाळांमध्ये परिचारीकांचे पद भरण्याचे पाऊल उचलल्या गेले आहे. - **लिना बनसोड**, आयुक्त, आदवासी विकास विभाग, नाशिक.

# अचलपूरच्या उपजिल्हा रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन बंद

## रुग्णांची खासगी केंद्रांकडे धाव ; अनेक रुग्णांना आर्थिक भूर्दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अचलपूर** अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन गेल्या १५ ते २० दिवसांपासून बंद असल्याने उपचारासाठी येणाऱ्या गोरगरीब रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सिटीस्कॅनची गरज असलेल्या रुग्णांना नाइलाजास्तव खासगी केंद्रांचा आधार घ्यावा लागत असून, त्यासाठी अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून मशीनची दुरुस्ती करून ती रुग्णसेवेत सुरू करावी, अशी मागणी रुग्णांच्या नातेवाईकांकडून होत आहे. उपजिल्हा रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन



मध्ये सुमारे पंधरा दिवसांपूर्वी अचानक आवाज येऊन तांत्रिक बिघाड झाला. त्यानंतर मशीन बंद पडली. राज्यस्तरावरून एका ट्रस्टच्या माध्यमातून ही सिटीस्कॅन रुग्णालयाला उपलब्ध करून देण्यात आली असून, मशीनची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधित ट्रस्टमार्फत पार पाडली जात असल्याचे उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. मशीनमध्ये बिघाड झाल्यानंतर उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने संबंधित ट्रस्टकडे दुरुस्तीसाठी पत्रव्यवहार केला आहे. मात्र, अद्याप संबंधित एजन्सी किंवा ट्रस्टकडून दुरुस्तीची कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने सिटीस्कॅन मशीन बंद अवस्थेतच आहे. परिणामी, रुग्णांना खासगी केंद्रांमध्ये सिटीस्कॅन करून घ्यावा लागत असल्याचे चित्र आहे. यामुळे खर्च वाढण्याबरोबरच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना वेळ आणि प्रवासाचा अतिरिक्त त्रास सहन करावा लागत आहे.

### तातडीने दुरुस्तीची मागणी

उपजिल्हा रुग्णालयात तालुक्यासह मेळघाट परिसरातून मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. त्यामुळे सिटीस्कॅनसारखी अत्यावश्यक निदान सुविधा बंद राहिल्याने या रुग्णांच्या गैरसोयीत मोठी भर पडली आहे. गोरगरीब रुग्णांना शासकीय रुग्णालयातच परवडणाऱ्या दरात आवश्यक तपासणीची सुविधा मिळावी, यासाठी सिटीस्कॅन मशीन तातडीने दुरुस्त करून सुरू करणे गरजेचे आहे. प्रशासनाने याबाबत गांभीर्याने दखल घेऊन संबंधित ट्रस्ट व एजन्सीशी समन्वय साधत तातडीने दुरुस्तीची कार्यवाही करावी, अशी मागणी रुग्णांच्या नातेवाईकांकडून होत आहे.

सिटीस्कॅनसाठी राज्यस्तरावरून ट्रस्टला कंत्राट देण्यात आला आहे. पंधरा दिवस पूर्वी सिटीस्कॅन मध्ये तांत्रिक बिघाड झाला असून दुरुस्तीसाठी संबंधित ट्रस्ट सोबत पत्रव्यवहार करण्यात आला. अद्याप पर्यंत ट्रस्टच्या वतिने दुरुस्तीसाठी कोणीही आलेला नाही. आमचा पाठपुरावा सुरू आहे.
**डॉ. सुरेंद्र ढोले** अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर.

# आझाद हिंद मंडळाच्या ९९ व्या वर्षानिमित्त

## विशेष रील स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

९बुधवारा येथील आझाद हिंद मंडळाच्या ९९ व्या वर्षानिमित्त तसेच'गणेश उत्सव २०२६'च्या पर्वावर मंडळाच्या वतीने विशेषरील स्पर्धेचे आयोजनकरण्यात आले आहे. बाप्पाच्या आगमनानिमित्त आणि मंडळाच्या स्थापना दिवसाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या स्पर्धेतून परिसरातील तरुणांच्या कलागुणांना व सृजनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे.या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विजेत्यांसाठी आकर्षक रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.प्रथम क्रमांकासाठी ११,०००,द्वितीय क्रमांकासाठी ५,०००,तर तृतीय क्रमांकासाठी३,०००असे बक्षिसांचे स्वरूप आहे. स्पर्धेसाठीप्रवेश शुल्क रु ९९असून,स्पर्धेचे आयोजन १४ सप्टेंबर २०२६रोजी करण्यात येणार आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी१० सप्टेंबर २०२६पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे.तरुणांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कलागुणांना व कल्पकतेला वाव द्यावा,असे आवाहन आझाद हिंद मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी खालीलत्रेंक्षश्रश त्रैालिंकवर जाऊन आपली नोंदणी करावी: Google form linkhttps://




docs.google.com/forms/d/e/1F-IpQLScEt-NH1o-21n-6ZCuWnj7pK8-7uN3rgH70UKJ0T7fmiGj3uQ/view formusp=publish-editor

# महागाईची झळ राख्यांनाही; कच्च्या मालाच्या दरवाढीने राख्या महागल्या

## राखी बाजारपेठ सजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती** राखी पौर्णिमा अवघ्या काही दिवसांवर आल्याने अमरावती शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये राख्यांच्या खरेदीची लगबग वाढली आहे. गांधी चौक, अंबादेवी रस्ता, बापट चौक, चित्रा चौक, इतवारा बाजार, जवाहर गेट रोड, गाडगेनगर आणि मोची गल्ली परिसरात आकर्षक राख्यांचे स्टॉल सजले असून, सणाच्या पार्श्वभूमीवर महिला व मुलींची गर्दी वाढताना दिसत आहे. यंदा पारंपरिक राख्यांसोबतच फॅन्सी राख्यांना ग्राहकांची विशेष पसंती मिळत आहे. कलकत्ता फॅन्सी, स्टोन, मोती, कुंदन, रुद्राक्ष तसेच चांदीसदृश राख्यांनी बाजारपेठ सजली आहे. आकर्षक डिझाईन आणि विविध प्रकारांमुळे ग्राहकांसमोर निवडीसाठी अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. लहान मुलांसाठी कार्टून पात्रांच्या राख्याही बाजारात लक्ष वेधून घेत आहेत. मात्र, यंदा राख्यांच्या किमतीत वाढ झाली आहे. राखी तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती, मजुरी आणि वाहतूक खर्चामुळे राख्या गतवर्षीच्या तुलनेत सुमारे १५ ते २० टक्क्यांनी महागल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. दरवाढ झाली असली तरी सणाचा उत्साह कायम असून, ग्राहक आपल्या बजेटनुसार राख्यांची खरेदी करत आहेत. बाजारात साध्या आणि कमी किमतीच्या राख्यांपासून आकर्षक, डिझायनर आणि महागड्या राख्यांपर्यंत विविध प्रकार उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे बदलत्याकाळानुसार राखीच्या स्वरूपातही बदल होताना दिसत आहे. केवळ भाऊ-बहिणीच्या नात्यापुरती मर्यादित असलेली राखी आता महिलांमध्येही लोकप्रिय होत आहे. महिला एकमेकींना राखी बांधत असल्याने त्यांच्यासाठी खास मोती, स्टोन, कुंदन आणि ब्रेसलेट प्रकारातील राख्यांना चांगली मागणी आहे. राखी पौर्णिमा जसजशी जवळ येईल, तसतशी बाजारपेठांमधील गर्दी शहरातील आणखीवाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत राख्यांच्या खरेदीला अधिक वेग येण्याची अपेक्षा विक्रेत्यांकडून व्यक्त होत आहे.



### बाजारात उपलब्ध राख्यांचे प्रकार

- **कलकत्ता फॅन्सी राख्या**
- **स्टोन, मोती आणि कुंदन राख्या**
- **रुद्राक्ष व चांदीसदृश राख्या**
- **लहान मुलांसाठी कार्टून राख्या**
- **महिलांसाठी ब्रेसलेट प्रकारातील राख्या**



सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ अमरावती विदर्भ महाराष्ट्र देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :